| MHRT140000132024 | नियमित दिवाणी दावा क्र.०४/२०२४<br>(CNR No.MHRT14-000013-2024)<br>(नागेश भिकु धाडसे वि. अविनाश भिकु धाडसे) |
| --- | --- |

## निशाणी ०५ खालील आदेश
## (दिनांक २३.०७.२०२४)

**०१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ३९ नियम १ अन्वये प्रतिवादींचे विरुध्द म्हाप्रळ ग्रामपंचायत घर क्र.१०६ चे दुरुस्ती किंवा बांधकाम करु नये किंवा विल्हेवाट लावू नये तसेच वादीच्या कब्जेवहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करु अथवा करवू नये असा अंतरिम मनाई आदेश होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज (नि.क्र.०५) व म्हणणे (नि.क्र.४७) वाचले. सर्व कागदपत्रे व प्रकरणांचा अभिलेख पाहिला. वादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस. बी. बेर्डे व प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एम. ए. लोखंडे यांचा युक्तीवाद ऐकला.

**०३.** मौजे म्हाप्रळ, ता. मंडणगड, जि. रत्नागिरी येथील म्हाप्रळ ग्रामपंचायत घर क्र.१०६ हा या दाव्याचा विषय आहे. यापुढे या मिळकतीस संक्षिप्तपणे 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.

**०४.** वादी असे कथन करतो की, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ हे सख्खे भाऊ बहिण असून प्रतिवादी क्र.६ मयत झाले असून त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांना दाव्याचे कामी पक्षकार करण्यात आले आहे. दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांची एकत्रित

सामाईक मालकी व कब्जे वहिवाटीची वडीलोपार्जित दावा मिळकत असून ते त्यांचे मुळ घर आहे. मुळ घरामध्ये वादी व प्रतिवादी राहत होते व आहेत. तसेच प्रतिवादी हे सणानिमित्त व कुलदेवताच्या पुजेनिमित्त त्या घरात येत जात असतात. दावा मिळकतीमधून अन्य प्रतिवादी व वादी यांनी हक्क सोडलेला नाही. दावा मिळकतीच्या कर आकारणी पत्रकावर वादी व प्रतिवादी यांचे वडील भिकू सुडक्या उर्फ सुडकोजी धाडसे यांचे नाव नमुद आहे. दावा मिळकत ही वडीलोपार्जित व सामाईक मिळकत असताना देखील ग्रामपंचायत, वादी व इतर प्रतिवादी यांची संमती न घेता प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीमध्ये दुरुस्ती करीत आहे व त्याद्वारे दावा मिळकतीवरती हक्क गाजवण्याचा प्रयत्न करीत आहे. परिणामी प्रतिवादी क्र.१ यांनी कोणतेही बांधकाम किंवा दुरुस्ती करुन दावा मिळकतीची स्वरुप बदलू नये व केवळ स्वतःचा हक्क गाजवू नये या करीता निरंतर मनाई व दावा मिळकतीच्या कर आकारणी उताऱ्यावरती वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाची नोंद करणेबाबत आज्ञार्थी ताकीदीकरीता दावा दाखल केला आहे.

**०५.** वादी पुढे असे कथन करतो की, दावा गुणदोषावरती चालवून निकाल होईपर्यंत बराच कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या कालावधीमध्ये वादी यांचे दावा मिळकतीमधील हक्कसंबंध सरंक्षित करणे न्यायाच्या कारणास्तव गरजेचे आहे. त्यामुळे दरम्यानच्या कालावधीमध्ये सदर दावा मिळकतीत असलेले सामाईकातील ग्रामपंचायत म्हाप्रळ घर क्र.१०६ यावरती प्रतिवादी क्र.१ यांनी कोणतेही बांधकाम किंवा दुरुस्ती करु नये तसेच तिचे नुकसान करु नये किंवा विल्हेवाट लावू नये आणि दावा मिळकतीमध्ये अन्य कोणतेही त्रयस्थ इसमांचा हक्कसंबंध निर्माण करु नये असा अंतरिम मनाई आदेश

प्रतिवादी यांचेविरुध्द करण्याची मागणी केली आहे.

०६. वादीने कथनांच्या पुष्ठ्यर्थ यादी (नि.क्र.७) सोबत ग्रामपंचायत घर क्र.१०६ ची कर आकारणी उताऱ्याची सहिसूद प्रत, फेरफार क्र.६९६७ ची सहिसूद प्रत, दि.०५/०१/२०२४ रोजीचे ग्रामपंचायतीला दिलेल पत्र, दावा मिळकतीचे वस्तुस्थिती दर्शक छायाचित्रे तसेच निशाणी क्र.४३ सोबत अनुक्र.१ ला दावा मिळकतीमध्ये एकत्रित सण साजरे करीत असलेबाबत एकुण पाच छायाचित्रे हजर केली आहेत.

०७. अंतरीम मनाई अर्जावरती प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.४७ वरती आपले म्हणणे दाखल केले आहे तसेच प्रतिवादी क्र.२, ४, ५, ६–अ, ६–ब, ६–क, ७ व ८ तर्फे प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केलेले म्हणणे व कैफियत हेच त्यांचे म्हणणे व कैफियत असल्याची नि.क्र.५० वरती पुरशिस अभिलेखावरती दाखल केली आहे.

०८. प्रतिवादी यांनी दाव्यातील तसेच प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादी यांच्या कथनानुसार, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे वडील हयात असतानाच प्रतिवादी क्र.१ यांचे हिश्यात कौटूंबिक वाटपानुसार आलेली असून सदर घरांमध्ये प्रतिवादी क्र.१ हे त्याच्या वडीलांपासून आजतागायत राहत असून सदर दावा घर मिळकत पूर्वीपासून आजतागायत प्रतिवादी क्र.१ चे ताब्यात व कब्जात आहे. दावा मिळकतीशी कधीही वादी यांचा कोणताही संबंध नव्हता व नाही. वादी व प्रतिवादी क्र.१ चे वडील हयात असलेपासून वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ हे सर्व स्वतंत्र व वेगवेगळे राहत आहेत. त्याप्रमाणे वादी क्र.१ हा कायमस्वरुपी मुंबई वडीलोपार्जित रुम मध्ये राहत आहेत. तसेच मौजे गाव म्हाप्रळ, ता. मंडणगड येथे दावा मिळकतीमध्ये

प्रतिवादी क्र.१ राहत असून प्रतिवादी क्र.२ हे घर क्र.४६५ मध्ये राहतात. तसेच प्रतिवादी क्र.३ हे रमेश भिकू धाडसे हे घर क्र.६४४ मध्ये राहतात. प्रतिवादी क्र.४ ते ७ ह्या वादी व प्रतिवादी क्र.१ च्या बहिणी असून त्या त्यांचा विवाह झाल्यानंतर ते त्यांच्या सासरी राहत आहेत.

**०९.** प्रतिवादी पुढे असे कथन करतो की, प्रतिवादी क्र.१ राहत असलेले घर हे पक्के स्वरुपातील असून ते हडप करण्याच्या उद्देशाने व प्रतिवादी यास नाहक त्रास देण्याचे उद्देशाने वादी याने खोटा दावा व प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. दावा मिळकत ही वादी क्र.१ यांच्या वाटणीस आलेले आहे. सदरचे घर जुने झाले असल्याने वादीने दावा दाखल करणेचे फार पूर्वीच सदरच्या घराची डागडूजी करुन नव्याने पक्या स्वरुपाचे घर बांधले आहे व त्याचा संपुर्ण खर्च प्रतिवादी क्र.१ यांनी केला आहे. सदर कामी प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केलेले छायाचित्रांचे अवलोकन केल्यास वादीचा अंतरिम मनाई आदेशाचा अर्ज हा बिनबुडाचा व बेकायदेशीर असल्याचे दिसून येते. त्यामुळे अंतरिम मनाई आदेशाचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**१०.** वादीतर्फे विद्वान विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.१ यांनी दाखल केलेल कैफियत व म्हणण्याचा विचार करीता, प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकत संपुर्णपणे स्वमालकीची असल्याचे कथन करीत आहे. तसेच वादी यांचा हक्कसंबंध नाकारत असल्याने प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीची नुकसान किंवा विल्हेवाट लावण्याची शक्यता आहे. प्रतिवादी क्र.१ हे वादीचे संमती न घेता दुरुस्ती करीत आहेत. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी कोणत्याही प्रकारचे वाढीव बांधकाम करु नये

याकरीता अंतरिम मनाई आदेश करणे गरजेचे आहे अन्यथा प्रतिवादी क्र.१ हा दावा मिळकतीची विल्हेवाट लावण्याची दाट शक्यता आहे.

**११.** याउलट, प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नव्हता व नाही. कौटूंबिक वाटपानुसार दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांच्या हिश्येस आलेली आहे. तसेच मुंबई येथील राहते वडीलोपार्जित घर हे वादी यांच्या हिश्यास आले असल्याने वादी क्र.१ हे मुंबई येथे कायमस्वरुपीपणे राहत आहेत. वादीस प्रथमदर्शनी केस नसल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**१२.** प्रतिवादी यांनी त्यांच्या कथनांच्या पुष्ठ्यर्थ यादी (नि.क्र.४५) सोबत अनुक्र.१ ला इतर प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.१ यास दिलेले मुखत्यारपत्र, नि.क्र.१९ सोबत दावा मिळकतीचे वस्तुस्थितीदर्शक पाच छायाचित्रांची पावती, नि.क्र.४१ सोबत कर आकारणी पत्रके, वीजबीले, पाणी पट्टी व घरपट्टीच्या पावत्या हजर केल्या आहेत.

**१३.** अर्ज, म्हणणे व दोन्ही बाजुंचे युक्तीवाद यावरुन या अर्जावर निर्णय देण्यासाठी खालील मुद्दे निघतात. त्यांचेसमोर मी माझे निष्कर्ष नमुद केले असून त्या खाली त्याची कारणे नमुद केले आहेत.–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस असल्याचे शाबित केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज नामंजुर झालेस वादीचे अपरिमित व कधीही न भरुन येणारे नुकसान होईल असे | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | वादीने शाबीत केले आहे काय ? | |
| ३. | न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे असे वादीने शाबीत केले आहे काय ? | **नाही.** |
| ४. | काय आदेश? | **...अर्ज नामंजूर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ ते ३ करिता–

**१४.** मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत व पुरक असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दा क्र.१ ते ३ एकत्रित विचारार्थ घेण्यात येतात.

**१५.** वादीच्या कथनानुसार, दावा मिळकती वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ यांच्या वडीलोपार्जित व सामाईक मिळकती आहेत. त्या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी यांची कब्जेवहिवाट व मालकी आहे. दावा मिळकत ही वडीलोपार्जित व सामाईक असल्याने वादी यांचा देखील दावा मिळकतीमध्ये समान हक्कसंबंध आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.१ हा वादी यांची कोणतीही परवानगी व संमती न घेता बेकायदेशीररित्या व अनाधिकाराने दावा मिळकतीची दुरुस्ती व बांधकाम करीत आहे. याउलट, प्रतिवादी यांचे कथनानुसार, दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ यांच्या हिश्यामध्ये कौटूंबिक वाटपानुसार आलेली आहे. दावा मिळकतीमध्ये केवळ प्रतिवादी क्र.१ यांची कब्जेवहीवाट असून वादी क्र.१ हे कायमस्वरुपी मुंबई येथील वडीलोपार्जित खोलीमध्ये राहत आहेत. दावा मिळकतीची दुरुस्ती दावा दाखल करण्याच्या फार पुर्वीच प्रतिवादी यांनी केलेली असून वादी कथन करीत असल्याप्रमाणे कोणतीही दुरुस्ती प्रतिवादी हे करीत नाहीत.

.... ७ .......

**१६.** उभयपक्षकारांचे दावा मिळकतीबाबत नमुद केलेल्या कथनांचा विचार करता, दावा मिळकत ही वडीलोपार्जित व सामाईक मिळकत असलेबाबत वाद नाही, परंतु प्रतिवादी क्र.१ चे कथनांनुसार दावा मिळकत ही कौटूंबिक वाटपानुसार त्याचे कब्जे वहिवाटीस देण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये अभिलेखावरती उभयपक्षकारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता दावा मिळकत व इतर मिळकतीवरती वादी व प्रतिवादी यांचे वडील भिकू सुडक्या उर्फ सुडकोजी धाडसे यांच्या नावाची नोंद असल्याचे दिसून येते.

**१७.** दावा मिळकत ही वडीलोपार्जित व सामाईक कधीही नव्हती असे स्पष्ट प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे म्हणण्यामध्ये नमुद केलेले नाही. महत्वपुर्ण बाब अशी की, कौटूंबिक वाटपासंदर्भातील कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादी यांनी अभिलेखावरती दाखल केलेला नाही. तसेच तोंडी वाटप झालेबाबतचे तपशिलवार वर्णन नमुद केले असल्याचे देखील दिसून येत नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे कथनांचे पुष्ठर्थ्य दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले सदरचे कागद हे वीजबीले, घर पट्टी व पाणी पट्टीच्या पावत्या आहेत. परंतु, त्या करपावतीवरती देखील भिकू सुडक्या धाडसे असे नाव नमुद आहे. सदर पावत्या व वीजबीले हे प्रतिवादी क्र.१ यांचे कब्जात आहेत असे मानले तरी कौटूंबिक वाटपानुसार दावा मिळकत ही केवळ प्रतिवादी क्र.१ यांचे कब्जेवहिवाटीस दिली असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. एकंदरीत उपरोक्त विवेचनावरुन दावा मिळकत ही कौटूंबिक वाटपानुसार प्रतिवादी क्र.१ याचे कब्जेवहिवाटीस दिल्याचे दिसून येत नाही.

**१८.** वादी यांनी वाद पत्रासोबत नि.क्र.७ सोबत अनुक्र.१ वरती मालमत्ता क्र.१०६ चा कर आकारणी उतारा दाखल केला आहे. कर आकारणी उताऱ्यावरती मालक नावाच्या सदरी भिकू सुडक्या धाडसे यांचे नाव नमूद असल्याचे दिसून येते. तसेच अनुक्र.२ वरील दाखल फेरफारावरुन भिकू सुडक्या धाडसे यांचे वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ हे वारस असल्याचे दिसून येते. वादीने वादपत्रासोबत दाखल केलेली कागदपत्रे ही वादीच्या कथनास प्रथमदर्शनी पुष्टी देतात.

**१९.** वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ यांचे दरम्यान असणारे नातेसंबंध प्रतिवादी यांनी नाकारलेले नाहीत. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ८ ही भावंडे आहेत. दावा मिळकती प्रथमदर्शनी वडीलोपार्जित व सामाईक असल्याचे दिसून येत असल्याने दावा मिळकतीमध्ये प्रत्येकाची कब्जेवहिवाट आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार, वादी क्र.१ हे मुंबई येथे कायमस्वरुपी वडीलोपार्जित खोलीमध्ये राहण्यास आहेत. परंतु, मुंबई येथील खोली ही वडीजोपार्जित असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावरती दाखल करण्यात आला नाही. उपरोक्त केले विवेचनाप्रमाणे प्रथमदर्शनी कौटूंबिक वाटपानुसार प्रतिवादी क्र.१ यांचे हिश्यामध्ये दावा मिळकत देण्यात आली होती असे दिसून येत नाही. याउलट, अभिलेखावरती दाखल कागदपत्रांवरुन वादी व प्रतिवादी यांच्या वडीलांचे नावाची नोंद महसूल दफ्तरी असल्याचे दिसून येते. परिणामी, दावा मिळकतीमध्ये केवळ प्रतिवादी क्र.१ यांची प्रथमदर्शनी कब्जेवहिवाट आहे असे म्हणता येणार नाही.

**२०.** यापुर्वी अंतरिम मनाई अर्ज नि.क्र.३४ वरती वादी यांनी दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी वादीस यास येणेस मज्जाव करु नये अथवा करवू नये या करीता तुर्तातूर्त

.... ९ .......

मनाईचा अर्ज दाखल केला होता. वादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांची सामाईक कब्जेवहिवाटी असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने वादीचे कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र.१ हे वादी यांना दावा मिळकतीमध्ये ये–जा करणेसाठी हरकत अडथळा करु नये अथवा करु नये असा अंतरिम मनाई आदेश करण्यात आला आहे. दाखल नि.क्र.३४ वरील मजकुराचा व केलेल्या मागणीचा विचार करता सदर अर्ज निकाली करतेवेळी प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीमध्ये करीत असलेले दुरुस्तीमुळे वादी यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होता किंवा कसे ही बाब विचाराधीन नव्हती. त्यामुळे सदरचा अर्ज दि.२०/०३/२०२४ रोजी मंजुर करणेत आला आहे. दावा मिळकतीमधील वादीचा हक्कसंबंध व अधिकार याचे सरंक्षण करण्यासाठी योग्य तो आदेश करण्यात आलेला आहे.

**२१.** वादीच्या कथनांनुसार, वादी व प्रतिवादी यांची दावा मिळकतीमध्ये कब्जेवहिवाट आहे. परंतु, वादीची परवानगी न घेता प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीमध्ये दुरुस्ती करीत आहेत. वादी किंवा प्रतिवादी यांनी लगतच्या कब्जेदार यांचे दावा मिळकतीमधील दुरुस्ती आहे किंवा कसे याबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. उभय पक्षकारांनी अभिलेखांवरती दाखल असणाऱ्या छायाचित्रांवरती भिस्त ठेवली आहे. वादी यांनी दाखल केलेल्या छायाचित्रांवरुन घराच्या छप्पराचे दुरुस्ती काम करीत असल्याचे कथन केले आहे. याउलट, प्रतिवादी यांनी घराच्या दुरुस्तीचे काम दावा दाखल करण्यापुर्वीच झाले असून प्रतिवादी हे कोणत्याही प्रकारचे दुरुस्तीचे काम करीत नसल्याने त्यांनी देखील अभिलेखावरती छायाचित्रे दाखल केले आहेत. वादी यांनी दाखल केलेल्या

छायाचित्रांनुसार दावा मिळकतीचे कौलाचे छप्पराची दुरुस्ती करीत असल्याचे दिसून येते. याउलट, प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या छायाचित्रांनुसार घराच्या छप्पराची दुरुस्ती दावा दाखल करण्यापुर्वीच झालेली आहे व त्या संदर्भातील छायाचित्रे दाखल केली असून छायाचित्रांसंदर्भात बील देखील हजर केले आहे. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये दुरुस्तीचे काम चालू आहे किंवा कसे याबाबत संदिग्धता निर्माण होत आहे.

२२. याउपरही, वादी यांच्या कथनांचा विचार करता प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीमध्ये दुरुस्ती व बांधकाम वादीच्या संमतीशिवाय करीत आहेत. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी यांनी वादी व इतर सहहिस्सेदार यांच्या संमतीशिवाय बांधकाम किंवा दुरुस्ती करु नये याकरीता अंतरिम मनाई आदेश देणे गरजेचे आहे. याउलट प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकती मधील दुरुस्ती प्रतिवादी यांनी दावा दाखल करण्याच्या पुर्वीच केलेली आहे. याउपर, वादीचे कथन जरी ग्राह्य धरले तरी सूध्दा दावा मिळकतीच्या छप्पराची दुरुस्ती करीत असल्याचे दाखल फोटोवरुन दिसून येते. सध्याचे पावसाळ्याचे दिवस असल्याने सदर दुरुस्ती करणे आवश्यक आहे. अन्यथा दावा मिळकतीचे नुकसान होणार आहे.

२३. दोन्ही बाजुंच्या विद्वान विधिज्ञांचा काळजीपुर्वक विचार करता, सध्याचे दिवस हे पावसाळ्याचे दिवस आहेत. सदरचा भाग हा कोकण क्षेत्रामध्ये असल्यामुळे या ठिकाणी अतिपर्जन्यवृष्टी होत असते. अशा परिस्थितीमध्ये दावा मिळकतीचे छप्पर दुरुस्ती न केल्यास दावा मिळकतीचे अतोनात नुकसान होणारे आहे. प्रतिवादीचे कथनांनुसार, प्रतिवादी क्र.१ हे त्या दावा मिळकतीमध्ये राहत आहेत व वादीच्या कथनांनुसार, वादी त्या

मिळकतीमध्ये येवून जावून असतात. उपरोक्त केलेल्या विवेचनाप्रमाणे, दावा व प्रतिवादी यांचा सामाईक हक्कसंबंध असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये दावा मिळकतीमधील वादीचा हक्क सरंक्षित करीत असताना प्रतिवादी यांचा देखील हक्क सरंक्षित करणे गरजेचे आहे. तसेच दावा मिळकतीचे प्राधान्याने सरंक्षण होणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास दावा मिळकतीचे नुकसान होणारे आहे.

२४. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे छप्पराचे दुरुस्ती केल्यास वादी यांचे अतोनात व भरुन न येणारे नुकसान होणारे आहे असे दिसून येत नाही. याउलट, छप्पराचे दुरुस्ती न केल्यास दावा मिळकतीचे नुकसान होणारे आहे असे दिसून येते. त्यामुळे वादीच्या बाजूने अंतरिम मनाई आदेश न दिल्यास वादीचे न भरुन येणारे नुकसान होणारे आहे असे दिसून येत नाही.

२५. प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क संबंध प्रस्थापित करु नये म्हणून अंतिम मनाई आदेशाची मागणी केलेली आहे. परंतु, प्रतिवादी हे दावा मिळकत हे विक्री करीत आहेत किंवा हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. याबाबतचा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावरती वादी यांनी दाखल केलेला नाही. प्रतिवादी दावा मिळकत हस्तांतरीत करतील अशा शक्यतेचा कोणताही पुरावा अभिलेखावरती दाखल नसलेकारणाने वादीची ही मागणी मंजुर करता येणार नाही.

२६. उपरोक्त विवेचनाचा विचार करता, वादी हा त्याचे बाजुने सकृतदर्शनी केस असल्याचे शाबीत करीत नाही. प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजुने नसल्यामुळे न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने नाही. प्रस्तुतचा अंतरिम मनाई अर्ज नामंजुर केल्यास

....१२ .......

वादी यांचे अपरिमित व कधीही भरून न येणारे नुकसान होणारे आहे असे दिसून येत नाही. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ करीता खालील आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजुर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करणेत आला आहे.)

MITHUN ASHOK SHINDE
Digitally signed by MITHUN ASHOK SHINDE
Date: 2024.07.27 14:49:53 +0530

**(एम. ए. शिंदे)**

**दिनांक –२३/०७/२०२४.** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मंडणगड**

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri. |
| Name of Stenographer | :- | Shri. D. R. Joshi |
| Date of Decision | :- | 23/07/2024. |
| Signed by P.O. on | :- | 23/07/2024. |
| Uploaded on | :- | 27/07/2024. |

.... .......